महा मेट्रो

PUNE METRO

# माननीय उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य अजित पवार यांची मेट्रोच्या विविध कार्यस्थळांची पाहणी




**पुणे , २५.०९.२०२० :**महामेट्रो पुण्यामध्ये वनाज ते रामवाडी व पीसीएमसी ते स्वारगेट या दोन मार्गिकांची उभारणी करत आहे. आतापर्यंत साधारणतः ४३ % काम पुर्ण झाले आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हयाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी आज दि. २५.०९.२०२० रोजी मेट्रोच्या तीन ठिकाणी बांधकामाची पाहणी केली. पुणे मेट्रोची स्थानके ही इतर वाहतूक साधने उदा. रेल्वे स्टेशन, पीएमपीएमएल, बीआरटी व एस टी. बस स्थानक यांच्याशी समन्वयाने जोडण्यात येणार आहे. जेणेकरून प्रवाशांना मेट्रो स्थानकांवरून रेल्वे स्थानके, पीएमपीएमएल बस स्थानक , एस टी बस स्थानक किंवा बीआरटी येथे कुठलाही रोड न ओलांडता जाता येइल. पुणे मेट्रो स्थानक व पुणे रेल्वे स्थानक या दोघांना जोडण्यासाठी जी उपाययोजना करण्यात येणार आहे. ती आज माननीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रत्यक्ष भेट देऊन समजून घेतली. या उपाययोजनेमुळे रेल्वेतून आलेली किंवा जाणारे प्रवासी विनासायास मेट्रो स्थानकांवर जाऊ किंवा येऊ शकतील. यासाठी त्यांना कुठेही रोड ओलांडावा लागणार नाही. अशाप्रकारची व्यवस्था पुणे मेट्रो कासारवाडी, शिवाजीनगर, वल्लभनगर, स्वारगेट, येरवडा येथे करणार आहेत.

पुणे मेट्रोसाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रेनची देखभाल करण्यासाठी कोथरूड (वनाज) व कृषी महाविद्यालय येथे डेपो उभारण्यात येत आहे. नियमित स्थरावर मेट्रोच्या ट्रेनची साफसफाई , तांत्रिक दुरुस्त्या करण्यासाठी या

डेपोचा वापर करण्यात येतो. कोथरूड येथील कचरा डेपो ही जागा पुणे महानगरपालिकेकडून पुणे मेट्रोला डेपो बांधण्यासाठी उपलब्ध करून दिली . त्यामुळे मेट्रो उभारणीतील एक मोठा अडसर दूर झाला. माननीय उपमुख्यमंत्री यांनी कोथरूड डेपोला भेट देऊन पुणे मेट्रोने केलेल्या कचरा डेपोचा कायापालट अत्याधुनिक कोच डेपो मध्ये कशारितीने केला जात आहे हे समजावून घेतले. पुणे मेट्रोसाठी अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत म्हणून कोथरूड येथील जागेचा व्यापारी तत्वावर वापर करण्यात येणार आहे. त्याबद्दल देखील माननीय उपमुख्यमंत्री यांनी समाधान व्यक्त केले.

कृषी महाविद्यालय येथुन मेट्रोच्या भुयारी मार्गाला सुरवात होते. आजमितीस १४०० मी. चे भुयार एका टनेल मशीनने पूर्ण केले आहे व दुसऱ्या टनेल मशिनने (टी.बी.एम.) १२८० मी. भुयार पूर्ण केले आहे. पुणे शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात भुयारी मार्गाचे प्रथमच काम होत आहे. माननीय उपमुख्यमंत्री यांनी थेट टीबीएम मशीनपर्यंत जाऊन भुयारी मार्ग बनवण्याची प्रक्रिया समजुन घेतली. पुणे मेट्रो भुयारी मार्गाचे काम गुणवत्तापूर्वक व सुरक्षेला अनुसरून करत आहे त्यासाठी उपमुख्यमंत्री यांनी समाधान व्यक्त केले .

सुमारे एक आठवड्यापुर्वी दि. १८.०९.२०२० रोजी मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फुगेवाडी मेट्रो ऑफिस मध्ये मेट्रो कामाचा आढावा घेतला व संत तुकारामनगर मेट्रो स्थानक , सिव्हिल कोर्ट मेट्रो स्थानक , नळ स्टॉप येथील डबल डेकर फ्लाय ओव्हर चे काम आणि स्वारगेट येथील मल्टी मोडेल ट्रान्सपोर्ट हब येथील मेट्रो स्थानकाची पाहणी केली होती . त्याप्रसंगी मा . उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलेकी महाराष्ट्र शासन पुणे मेट्रो प्रकल्पाला आवश्यक तो वित्तपुरवठा आणि मेट्रोसाठी लागणाऱ्या जागांचे स्थानांतरण यासाठी सर्वोतोपरी

मदत करेल. पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी मा. अजित पवार उपमुख्यमंत्री यांना पुणे मेट्रोसाठी सोलर पावर, झाडी स्थानांतरण करण्यासाठी योजलेल्या पद्धती (रूट बॉल टेक्निक), रेन वॉटर हार्वेस्टिंग व बायोडायजेस्टर इ. पर्यावरणपूरक उपाययोजनांची माहिती दिली.




R THE SIGNATURE OF HON'BLE DEPUTY CHIEF MINISTER

